Please Consider the Environment Before Printing…

**Date: 27/05/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष

## चित्रकार, नृत्यदिग्दर्शक कृष्णदेव मुळगुंद



कृष्णदेव मुळगुंद हे नामवंत नृत्य कलाकार, नृत्य दिग्दर्शक आणि वेशभूषाकार म्हणून ओळखले जायचे. पुण्यात मुलांसाठी नाट्यगृह निर्माण करण्याचे श्रेय त्यांना दिले जाते. कृष्णदेव मुळगुंद यांचा जन्म २७ मे १९१३ रोजी नाशिक येथे झाला. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांनी ललित कलेचा अभ्यास करण्यासाठी मुंबईच्या सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेश केला. ते तोपर्यंत कधीच औपचारिकपणे नृत्य शिकले नव्हते. मात्र, नंतर मुंबईतील ओपन थिएटरमध्ये ते हजेरी लावू लागले. सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमधून पदवी घेतल्यानंतर मुळगुंद पुण्यात आले. इथे रेणुका स्वरूप मुलींच्या उच्च माध्यमिक शाळेत ते कलाशिक्षक म्हणून रुजू झाले. तिथे त्यांनी लोकनृत्यही शिकवायला सुरुवात केली. शाळेतल्या वेळेव्यतिरिक्त त्यांना वेळ मिळत असल्याने त्यांनी पुण्यात बालनाट्य व मुलांच्या नाट्यगृहाची कल्पना विकसित केली.

मुळगुंद यांच्या नाटकांना स्थानिक पातळीवर नावलौकिक मिळण्यास सुरुवात झाली. तेव्हा रोहिणी हट्टंगडी आणि स्मिता पाटील या कुशल मराठी कलाकारही सुरुवातीच्या काळात प्रशिक्षण घेण्यासाठी त्यांच्याकडे आल्या होत्या. नाटके लिहिण्याबरोबरच मुळगुंद चित्रपटांसाठी कोरिओग्राफ व वेशभूषाही करीत असत. डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित आणि नाटककार विजय तेंडुलकर यांनी लिहिलेल्या घाशीराम कोतवाल नाटकातही त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. मुळगुंद यांनी बाबासाहेब पुरंदरे यांच्या 'जाणता राजा' या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाटकातही नृत्यदिग्दर्शन केले होते. समर्थ रामदास यांच्या कार्यावर आधारित 'आनंदवनभुवनी'वरही त्यांनी काम केले. कला व नृत्य क्षेत्रातील मुळगुंद यांच्या योगदानामुळे त्यांना कलाछाया पुरस्कार, कलागौरव पुरस्कार आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा पुरस्कार मिळाला आहे. कृष्णदेव मुळगुंद यांचे ११ मे २००४ रोजी निधन झाले.

Nashik Edition
May 27, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK